# सायबर सुरक्षेविषयी सर्वांनी जागरूक राहावे

## डॉ. गौतम कांबळे : विद्यापीठात क्विक हिल फाऊंडेशनतर्फे कार्यक्रम

**सोलापूर : पुढारी वृत्तसेवा**

आता सर्वच क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढलेला आहे. प्रत्येक जण मोबाईलचा वापर करत आहे. त्यामुळे ऑनलाईन फसवणुकीचे प्रकारदेखील वाढत आहेत. अशा वेळी सर्वांनीच सायबर सुरक्षेविषयी जागरूक राहावे, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू गौतम कांबळे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने २०१७-१८ पासून 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम राबविला जातो. या उपक्रमामध्ये संकुलातील संगणकशास्त्र व एमसीए विभागातील विद्यार्थ्यांना क्विक हिल फाऊंडेशनमार्फत सायबर सिक्युरिटीचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाचे उद्घाटन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. कांबळे यांच्या हस्ते झाले. यावेळी क्विक हिल फाऊंडेशनच्या वरिष्ठ कार्यकारी अधिकारी सुगंधा दानी, सोलापूर सायबर पोलिसचे वसीम शेख व प्रांजली काळे यांनी प्रक्षिक्षण दिले.

### दीड लाखावर विद्यार्थ्यांना दिली माहिती

संकुलातील १५० विद्यार्थी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. प्रक्षिणानंतर क्विक हिल फाऊंडेशनकडून काही विद्यार्थ्यांची सायबर वॉरियर्स म्हणून निवड केली. हे सायबर वॉरियर्स जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन विद्यार्थ्यांमध्ये व्याख्यानाद्वारे सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणार आहेत. मागील पाच वर्षांत या सायबर वॉरियर्सनी जिल्ह्यातील व्याख्यानाद्वारे एक लाख ५७ हजार १६५ विद्यार्थ्यांमध्ये सायबर सिक्युरिटीबद्दल जागरूकता केली.